९८६३
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २१२२



REFBK-0018849
REFBK-0018849

श्री ना...
प्रकाश...

लेखक-
...नाथ पाठक
दुसरखेडेकर.

# विचित्र सागर

संदर्भ
काव्य २१२२
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक
अनुक्रम ८०३७९ काव्य
२१२२ १।६०३

॥ श्री ॥

त-म-सो-मा-ज्यो-ति-र्ग-म-य

ॐ नमोऽचण्डिकायै

ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्र. क्र. १८८४९

# विचित्र-सागर

REFBK-0018849
REFBK-0018849

नाथ--पाठक

दुसखेडकर

विरचित

श्री. नाथ प्रकाशन, दुसखेड-जळगाव

प्रकाशन क्रमांक : ३

श्री. नाथ प्रकाशन, दुसखेड ( जळगाव )

प्रकाशक व लेखक : श्री. नाथ-पाठक, दुसखेडकर

प्रथमावृत्ती : चैत्र शु. प्रतिपदा, शके १८९५
दि. ४ एप्रिल १९७३

सर्व हक्क : लेखकाचे स्वाधीन

मुद्रक : व. म. गुप्ते — सुभाष-मुद्रणालय,
व्यव. : वि. गो. जोशी (तिवसकर) तपोवन-अमरावती

किंमत : तीन रुपये

# प्रस्तावना

श्री. नाथ–पाठक, दुसखेडकरशास्त्री हे कळकळीचे सज्जन गृहस्थ आहेत. दुर्गासप्तशतीचें आपण केलेलें भाषांतर प्रसिद्ध होईतों अन्नग्रहण न करण्याचा आणि शिवलेलें वस्त्र अंगांत न घालण्याचा, कठोर कृतनिश्चय केलेल्या अवस्थेंत अमरावतीस आले असतां मी त्यांस कांही वर्षांपूर्वी प्रथम पाहिलें. त्यानंतर "गीतांजली"–वर कांही लिहिलें असतांहि पुनः आपण भेटलों होतों, असें ते मला सांगतात. माझ्या माहितीप्रमाणें "विचित्र सागर" हें त्यांचें तिसरें पुस्तक आहे. ह्याला मींच प्रस्तावना लिहावी, असा त्यांचा प्रेमळ आग्रह आहे.

ह्या लहानशा पुस्तकाविषयीं अगदी पहिली सांगण्याची गोष्ट म्हणजे ही की, हा "सागर" फारच लहान आहे! आणि ह्यांतील सर्वच कविता "विचित्र"-हि नाहीत. हल्लीच्या सामाजिक परिस्थितीवर, त्यातील कांही बाबींवर आणि राजकीय परिस्थितीवर विरोधा-भासात्मक, उपरोधी, वगैरे ज्या कविता ह्या संग्रहात आहेत, त्याच सुंदर कविता म्हटल्यास, "विचित्र" ह्या सदरांत पडण्याजोग्या आहेत; आणि एका दृष्टीने त्या कविताच ह्या लहानशा संग्रहांतील सर्वोत्तम कविता आहेत, असें म्हटलें तरी एकवेळ चालेल पण बाकीच्या कविता "विचित्र" ह्या सदरांत पडत नसल्या, तरी कांही "सुंदर" आणि कांही "चांगल्या" ह्या सदरांत नक्कीच

पडतील. ह्या पुस्तकांत स्वकृत सुंदर सुभाषितें आहेत; "सुधाबिंदु" म्हणून लहानसें चांगल्या सूटय श्लोकांचें ह्यांत प्रकरणच आहे; संस्कृत सुभाषितांचीं चांगलीं भाषान्तरें आहेत; स्वकृत चतुर अन्योक्ति आहेत; आणि सुंदर कल्पनाहि कोठें कोठें आहेत. अनुप्रासाचाहि छंद कोठें कोठें भागवून घेतलेला आहे. "नंबर प्राप्ती" सारख्या छानदार विनोदी कविताहि ह्यांत आहेत. आनंदाची गोष्ट म्हणजे, आधुनिक काळांतील कविता असून, मर्ढेकरी दुर्बोधता, विक्षिप्तता, बेडसरपणा किंवा अश्लीलता, ह्यांचा गंधहि कोठें ह्या कवितांत नाही. "पितृऋण" सारख्या एक दोन ठिकाणीं 'ऋ' हें जोडाक्षर मानून त्याच्या मागील अक्षर दीर्घ धरलें आहे (श्लोक ११ वा). समोर जोडाक्षर आलें असून मागे दोन मात्रा मानल्या नाहीत, असें दोन-तीन ठिकाणीं झालें आहे. तें सोडल्यास वृत्तें निर्दोषपणें वापरलीं आहेत. ऱ्हस्व-दीर्घाची ओढाताण कोठें कोठें झाली आहे. "दुःख" एवजी "दुख" असे एक-दोन अपप्रयोगहि झाले आहेत. 'व' हें उभयान्वयी अव्यय कवितेंत कधी वापरीत नाहीत; पण ह्या पुस्तकांत तीन-चार ठिकाणीं तें वापरलें गेलें आहे पण एकंदरीत, हे लहान-सहान दोष सोडल्यास, हा कवितासंग्रह चांगला आहे.

माघ वद्य ४, शके १८९४ — बळवंत गणेश खापर्डे

दि. २१-२-१९७३ इ. — अमरावती

# पुरस्कार

वाची बरवे कवित्व । कवित्वीं रसिकत्व ।
रसिकत्वीं परतत्व । स्पर्शू जेवी ॥

काव्य हा मानवीमनाचा स्थायी भाव आहे. ॲरिस्टॉलनें Man is a rational animal अशी मानवाची व्याख्या केली आहे व एकीकडे Rational ह्या शब्दानें मानवाचा इतर प्राण्यापासून वेगळेपणा दर्शविला आहे तर दुसरीकडे Animal ह्या शद्वानें त्याला द्विपाद पशू ठरविले पण बुद्धी हे मानवाचे व्यवच्छेदक लक्षण मानता येणार नाही.मानवेतर जीव सृष्टीतही कांही प्रगत प्राण्यामध्ये तरी उपजत प्रवृत्तीची पातळी ओलांडून बुद्धीप्रगत अवस्थेत कार्यान्वित झालेली दिसते. मानवांत ती विशेष विकसित झाली असेल येवढेच पण काव्यानुभूतिच्या बाबतीत असे म्हणता येणार नाहीं. मानवेतर जीवसृष्टीच्या अनुभवविश्वांत काव्यात्मतेला मुळीच स्थान नाही.

पशुंचें अन्तर्बाह्य जीवन हें पूर्णतया विकार–विलसितच आहे पण मानवी मन हें केवळ विकारांची क्रीडास्थली नाही. विकारांच्या भाऊगर्दीतही कांहीं भव्योदात्त भावनांच्या सूक्ष्मतरल स्पंदांनीं मानवी मनोविश्व अखंडपणें निनादित झालेलें असतें. त्या भावस्पंदांची अनुभूती व्यक्तीपरत्वे न्यूनाधिक असू शकते.त्यांची प्रतीति व्यक्तिविशिष्ट भिन्नभिन्न स्वरुपाची असेल.त्यामुळेच काव्य विश्व अनन्त अपार वैचित्र्यानें नटलें आहे. मानवांत आढळणाऱ्या काव्यात्मतेची साक्ष आदिमानवापासून आजवर विकसित झालेल्या मानवी जीवनांत आढळेंल. नव्हे, ह्या काव्यात्म संवेदनेच्या आविष्काराची अखंड धडपड हेंच मानवी जीवनाचे अन्तरंग लक्षण समजावे लागेल.

इतर प्राणी मूक आहेत पण मानवाला लाभलेली शद्वविशिष्ट ध्वनीची (Articulate Sound) देणगी म्हणजे त्याच्या काव्यात्मतेचें बाह्य चिन्ह होय.ह्या अन्तरिक भाव स्पंदाच्या आविष्कारा.

साठीं धडपडणारी त्याची अस्मिता मानवाच्या पहिल्या वहिल्या शद्बोच्चाराने मुखरित झाली असावी. मानवांचा पहिला शब्दध्वनी हा निश्चितपणें त्याच्या अन्तरिक भावनांचा प्रतिध्वनि म्हणूनच बाहेर पडला असेल.

वर सांगितल्याप्रमाणे मानवी शद्बाच्या कुळकथेचे मूळ जरी त्याच्या काव्यात्म आविष्काराच्या धडपडींत असले तरी हेच प्रयोजन सर्व व्यवहारांत कायम राहिले असे नाहीं. तर बहुसंख्य मानवांचा वाचिक व्यवहार हा बव्हंशीं काव्य विपरित रुक्ष विचारांच्या व विकार वासनांच्या प्रदर्शनार्थच होतो. हे सर्व खरें असलें तरी आजही शद्ब हेच उदात्त भावनाविष्काराचें एकमेव प्रभावी साधन आहे. अन्तः-करणांत दाटून आलेल्या भावनोर्मींना शेवटीं शद्बाच्याच आश्रयानें काव्यरूप घ्यावे लागते म्हणूनच **Poetry is the spantanious out flow of feelings** ही वर्डस्वर्थ कवीची प्रसिद्ध व्याख्या प्रमाण मानावी लागते.

काव्य कोणत्याही स्थलकालांत निर्माण झालेले असो,कितीही वैचित्र्यानें नटलेलें असो ते शेवटीं अन्तरिक दिव्यतेनें उजळून निघालेल्या भावनांचा शाद्बिक आविष्कार, ह्या सामान्य लक्षणानेच सिद्ध होते.

संस्कृत काव्य शास्त्रांत विश्वनाथासारख्या साहित्य विवेचकानें " वाक्यं रसात्मकं काव्यम् " अशी काव्याची व्याख्या केली आहे. ह्या काव्यगत रसवत्तेचें मूळही अन्तःकरणाच्या दिव्यांशातच दिसून येईल.मानवी अन्तःकरणांतील भावमाधूर्य शद्बरूप घेते तेव्हाच रस-निष्पत्ति होते व ही रसात्मकता रसिकाच्या हृदयवीणेच्या तारा छेडते.

काव्य विषय हे अनन्तविध आहेत.गवताच्या पात्यापासून आकाशाच्या विशाल नीलिमेपर्यंत, महासागरापासून खळखळणाऱ्या निर्झरापर्यंत, सुजनांच्या साधुत्वापासून तो मूर्तिमत् दौरात्म्यापर्यन्त, अव्याज मनोहर शिशूहास्यापासून प्रमदेच्या प्रमत्त विलासापर्यंत

आणि भव्योदात्तापासून तो बिभत्स भीषणापर्यंत अनंत विषयांस कवीच्या प्रतिभाविश्वात स्थान आहे.

स्थूल दृष्टीला दिसणारे सौंदर्य केवळ बाह्य आकर्षकतेत सामावले असते पण प्रातिभ दिव्य कवी–दृष्टीला सकृद्दर्शनी क्षुद्र, तुच्छ किंबहुना ओंगळ वाटणाऱ्या वस्तुमध्येंही सौंदर्याचा साक्षात्कार होतो.

मानवी काव्यात्मतेच्या विकास-पथावर मानदंडाप्रमाणे विलसणाऱ्या दिक्कालातीत काव्यकृतीचा मागोवा घेतला तर भगवंताचे स्वयंभू सामर्थ्य ह्या काव्यरूप अपरसृष्टीच्या निर्मात्यां-तही आढळून येईल. विश्व हे अनंत अविनाशी, सत्यशील सौंदर्यात्मक भगवद्रूपाच्या पूर्णत्वाचे प्रतिबिंब असेल तर त्या पूर्णत्वाची माहिती आब्रम्हास्तंबपर्यन्त पसरलेल्या त्याच्या अणुरेणूंत खऱ्या कवीला येते व ती त्याच्या काव्य सृष्टींत परावर्तित झालेली दिसते. कवी हा दिक्कालाला भेदून अनंताचा वेध घेणारा क्रान्तदर्शी असतो.

"कविर्मनीषी: परिभू: स्वयंभू: " ह्या उपनिषद्वाक्यात हेच सांगितले आहे. कवित्वाचा भव्योत्तुंग आदर्श ज्यांच्या काव्यात प्रतिबिंबित झाला आहे. त्यांच्या, रसिकांच्या ठिकाणी अव्यक्त असणाऱ्या काव्यात्मतेला साद घालणाऱ्या काव्याचा यथाशक्ति आस्वाद घेणे हेच सामान्याचे मर्यादित कार्य. त्यांच्या उत्तुंग प्रतिभेचे संपूर्ण आकलन त्यांच्या शक्तिबाहेरच असते.

जन सामान्यांच्या निसर्गसिद्ध रसिकतेला आवाहन करून विश्ववैचित्र्याच्या सौंदर्याचा आस्वाद घेण्याची पात्रता त्यांचे ठिकाणी विकसित करण्याचें कार्य हे प्रस्तुत संग्रहासारख्या काव्य ग्रंथांना साधावयाचे असते. कान्हदेशनिवासी " श्री. नाथ–

पाठक, दुसखडकर ह्यांचा हा काव्य-संग्रह ह्या दृष्टीने रसिकांना निश्चित स्वागतार्ह वाटेल. आशय आणि अभिव्यक्तीच्या संदर्भात नव काव्याच्या आजच्या युगात हा काव्य संग्रह परंपरानिष्ठ वाटला तरी "क्षणे क्षणे यन्नवतां विधते रूपं खलु तद्रमणीयतायाः" ह्या उक्तीप्रमाणे काव्याचे रमणीय नित्य नूतनत्व ह्या संग्रहात अनेक ठिकाणी रसिकांना अनुभवास मिळेल.

ह्या काव्यसंग्रहातील कवितांनी परंपरागत वृत्तांचा व चालींचा आश्रय केला आहे पण त्यातील आशय मात्र वर्तमानाला धरून आहे. त्यात वर्तमान, सामाजिक व राजकीय परिस्थितीवर विदारक प्रकाशझोत टाकला आहे. उदा. 'माझा नमस्कार त्या,' 'व्याख्या स्वराज्यास रे,' 'मंगल वासना,' 'आधी सर्वा नमी मी' वगैरे. राखिल मजला राज्यनीति ह्यासारख्या कवितातून कवीने राज्यकर्त्यांच्या मुसलमान धार्जिण्या लाचारीवर अचूक बोट ठेवले आहे. उपरोध व उपहास ही कवीच्या संग्रहातील राखीव बासने दिसतात. कांहीं कविता आपल्या सुश्लिष्ट व प्रसन्न रचनेने संस्कृत काव्यातील पूर्वसूरींची आठवण करून देतात. उदा- 'शारदा वंदन,' 'ना जाणती मानव' वगैरे. अन्योक्ति ह्या जुन्या काव्य प्रकारासही नवीन उजाळा देण्याचा प्रयत्न नाथ-पाठकांनी केला आहे. सुभाषित ह्या काव्यप्रकाराचाही यथोचित वापर केलेला आपणास येथें आढळेल. उदा- आनंद मर्म, जेथें प्रतिष्ठा तिथें, अभ्युदय मर्म वगैरे. 'गृहदीप नको विझवू रे' ह्यासारख्या कवितातून तत्वचिन्तन व व्यवहार्यता ह्यांचा सुंदर समन्वय साधला आहे. यावरून कवीच्या कल्पना विलासाचा परिचय होतो. 'तोड मला हरि' हा मूळ गीतांजलीतील कवितेचा अनुवाद कवीच्या जीवन व मृत्यूकडे पहाण्याचा दृष्टीकोन स्पष्ट करतो.

पुराण्या प्रवाशांस ह्यासारख्या प्रतिकात्मक कवितातून कवीची चिन्तन परता व्यक्त होते. "काळोख मजला गुरु वाटतो" ह्या कवितेतून प्रातिभ दिव्यतेच्या पुसट खुणा रसिकांना निश्चित आढळतील. 'तडित् कडाटही, गान सुरेले। वज्र पातही प्रसाद झाले। प्रबल दाह पण, मलय समीरण। असिधारा पण रम्य जीवन।' आदि पंक्तीतून अर्थगंभीरता परमोच्च बिंदूला पोचलेली दिसते.

स्थूल दृष्टीला दिसणारी विषमता ही वरवरची असून ह्या विश्वाचे अन्तरंग "साऱ्या विषमीं समत्व भासे," 'दुःखगरलही अमृत सरसे'। ह्या शब्दातून सूचित करून कवीने दिव्यानुभूतीचे सारसर्वस्व व्यक्त केले आहे. अशा रीतीने विविध भाव–छटांनी रंगलेला दैनंदिन व्यवहारापासून शाश्वत मूल्यापर्यंत विविध विषयांचा अन्तर्भाव करणारा व वैचित्र्यातून जीवनाच्या एकात्मतेच सूत्र सांभाळणारा हा विचित्र सागर रसिक–रंजन व उद्बोधन निश्चित करील. इत्यलम्–

**वि. वि. काळे**
मुख्याध्यापक,
एच्. इ. एस्.–हायस्कूल
(एच्. इ. एस्.) हिवरा (यवतमाळ)

॥ ॐ ॥

## विचित्र सागर परिशीलन

आपल्या काव्याचें परिशीलन केले, काव्यास्वादांत आनंद वाटल्याने वेळ सत्कारणीं लागला. आपल्या विचाराच्या सागरावर कल्पना तरंग खूप हेलावतात व त्यावर आपली नौका सहज लीलेने विहार करिते.

माझ्या शरीरप्रकृतीला धान्यमिश्रणाचे थालीपीठ मानवत नाही. तद्वतच माझ्या मनोवृत्तीला साहित्यातील थालीपीठ मानवत नाही. त्यामुळे आपल्या थालीपीठाचा नुसता वास घेतला; आस्वाद घेतला नाही.

काव्योदधींत मनसोक्त विहार करणाऱ्या तुमच्या सारख्यांनी डबक्याच्या पाण्यांत लोटीने स्नान करण्यांत आनंद मानणे योग्य नाही. तो प्रांत इतरेजनाकरिता आहे. स्पष्टोक्तीबद्दल क्षमस्व.

भुसावल, आपला,
कैवल्यकुटी **शं. बा. अडावदकर**
दि. २४ । १२ । ६८

---

पान नं. १८ ते ३२ पर्यंतच्या भागाला 'थालीपीठ' म्हणून आम्ही नांव ठेवले होते पण सदरच्या सासरवासाने त्याचे नांव बदलले आणि आता 'विचित्र सुग्रीव' ह्या नांवाने साखर वाटली. १।१।६९ **नाथ-पाठक**, दुसखेडकर

१८८४९
शाखा (स्थळ प्रत)

॥ॐ॥

## स्वमता विष्करणम्

काव्येदधिनिमग्नस्य नितरां मोदते मनः ।
किं नु काव्यरसः स्वादु यथा स्वादीयसी सुधा ॥१॥

कल्पना रमणीयेषु काव्येष्वद्य निमज्जतः ।
भवतः कथमानंदः कोहि विज्ञातुमर्हति ॥२॥

वाग्वैभवमभिव्यक्तिः स्पष्टार्थस्य पदावली ।
अनुप्रासो विनोदश्च सर्वतः काव्य-लक्षणम् ॥३॥

विचित्रे सागरे काव्ये तत्सर्वं खलु दृश्यते ।
तस्मात् कथं न स्तोतव्यः कर्ता काव्यस्य पण्डितः ॥४॥

नाथ-पाठक इत्येष श्लाघ्योगीर्वाण-पाठकः ।
साक्षात् पाण्डित्य मूर्तिश्च पाटवं संस्कृतोक्तिषु ॥५॥

पठित्वा फुल्लं तत्काव्यं बर्हिण इव भासते ।
मनो मे मोदते सम्यक् बहुना वचनेन किम् ?॥६॥

भुसावल,
कैवल्यकुटी — शं. बा. अडावदकर
दि. २६ । १२ । ६८

॥ श्री ॥

तमसोमाज्योतिर्गमय

ॐ नमश्चण्डिकायै

॥

विचित्र-सागर

॥

# अल्प निवेदन

॥

सुखानंदाकरिताच साऱ्या विश्वाचे प्रयत्न असतात. सुखाचा स्थायी भाव विनोद आहे तर विनोदाचें मिश्रण आहे. म्हणूनच पुरुष व प्रकृतीच्या मिलनांत सृष्टीचा विनोद सांठवला आहे. इतकेच नाहीतर ? पुरुष व प्रकृति असे दोन विभक्त भागाने राहून खरा विशेष व चिरंजीव आनंद मिळणार नाही म्हणूनच कीं काय ? अर्धे धोतर, अर्धे लुगडे, अर्धा गंध, तर अर्धे कुंकू असे रूप धारण करून अर्ध-नारी नटेश्वराच्या स्वरुपाने आमची आद्यदेवता प्रगट होऊन तिने जणू काय विज्ञानाचा पाया घालून दिला असावा असे वाटते.

आणि आजच्या जगानें नेमकें तेंच ओळखून शुद्ध ज्ञानाकडून विज्ञानाकडे, चित्राकडून विचित्राकडे धांव घेतली असावी, यांत शंका तर नाहीच पण तें अति उचित आहे. कारण सर्वंकष सर्वप्रिय झालेले "विज्ञान" विज्ञान

म्हणजे तरी काय ? तर विज्ञान म्हणजे "प्रयोगांचे प्रदर्शन" असे म्हणावे लागते आणि प्रयोग व प्रदर्शन हे दोन्ही शब्द असीम व अनाद्यन्त आहेत. प्रयोग केव्हा सुरू झाले व केव्हा थांबणार ? तसेच प्रयोग पण कोठून कोठे थांबणार हे साऱ्या विश्वाला अनाकलनीय आहे आणि अनाकलनीयाचा शोध लावणे व शोध करीत राहणे हेच तें विज्ञान होय आणि ज्या अनाकलनीयांचा आपण शोध करीत होतो व त्या शोधाकरिता जें जें व जसजसे मिश्रण केले व नाना प्रयोग केले त्यांचे योग्य असे जे लेखन–पट, तेच "विज्ञानशास्त्र" होय.

निर्गुण, निराकार, निर्विकार,चिरंतन आणि अनाकलनीय असणाऱ्या सच्चिदानंद प्रभूचा शोध करणे व करीत रहाणें ह्याला त्या बाजूनें जो परमार्थ म्हणतात तेंच ते विज्ञान आणि त्याच्या शोधाकरिता जें जे प्रयोग म्हणजे जें जें कर्म केले व जे प्रदर्शन दाखवलें त्यांचे शास्त्र म्हणजेच भक्तियोग शास्त्र होय. शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें प्रयोग करण्यांत चूक झाली; कीं उत्तर चुकलेच. तसेंच परमार्थांत सुद्धा कर्म करण्यात चूक झाली कीं उत्तर चुकतेंच चुकते. विज्ञान व परमार्थ एकच आहेत, असे आम्हास वाटतें. फरक इतकाच कीं,पाहिजे तर एक ऐहिक म्हणा व दुसरा पारलौकिक म्हणा. कारण ह्या दोहोंत गम्याकडून अगम्याकडे जाणें हेंच एक तत्व स्थूल झालें आहे.

व्यवहारातीलच उदाहरण पहा ना? केवळ तांबडाच रंग असणारे कापड जितकें शोभून दिसत नाही. त्याहीपेक्षा अनेक

रंगांची योग्य मांडणी करून नानाविध रंगांच्या मिश्रणानें रंगलेले कापड फारच आनंद देत असते अथवा केवळ नील-नभ जितके चित्ताकर्षक नसतें त्याहीपेक्षा नानाविध ताऱ्यांच्या योगानें अथवा सप्तरंगी इंद्रधनूनेच आकाश शोभून दिसते.

'चित्तं त्रायति इति चित्रम्'चित्तास जे तारते तेच चित्र. केवळ तारून परतीराला नेऊन (अरण्यांत) सोडून देण्याऱ्या-पेक्षा परतीराला नेऊन तेथें विशेष कांही जर असले तरच वैशिष्टय असते म्हणूनच 'विशेषेग चित्तं त्रायति इति विचित्रम्' तसाच अर्थ 'विशेषेण ज्ञानं इति विज्ञानं' असा विज्ञान शद्बांचा अर्थ आहे म्हणूनच आम्हास केवळ ज्ञानापेक्षा विज्ञान व केवळ चित्रापेक्षा विचित्र शद्ब जास्त प्रिय आहे. पाहिजे तर आपण आम्हास विचित्र म्हणा. हे मात्र निश्चितच कीं आम्ही विचित्र नाहीतच.

तसेच आमचे प्रेम, सागर ह्या शद्बावर जास्त आहे. तो रत्नाकर आहे म्हणून नव्हे तर त्यांत अनेकविधांचे मिश्रण असून विपूल गुणता आहे म्हणून. आपली पुरातन पद्धत अशी आहे कीं मुलांच्या संस्कारावरून व मुलातील गुणते-वरून त्याच्या जनकाच्या स्वाभाविक भावांचे मोजमाप करितात, सागरांत लक्ष्मीचे चांचल्य, कौस्तुभाचे काठिण्य, पारिजाताचा गंध, मदिरेचा मद, धन्वन्तरीचे कारुण्य, चंद्राचा क्षय, कालकूटाचा जहरीपणा इत्यादि सर्व गुणाचा आगरच पहायला मिळतो. हे जरी असले तरी, दैवी संप-त्तीच्या देवांनाच अमृत दान करण्याची त्याची पात्रता आहे. हे मात्र निश्चित कीं, मंदार पर्वताप्रमाणे मन अचल

ठेवलें; तरच ह्या साऱ्या गुणांचा आविष्कार पहायला मिळेल.

असे म्हणतात कीं देवासुरांनी मंदाराची रवी केली होती. देव असोत वा दानव असोत त्याच्या मनोरुपी रवीला 'रवी' प्रमाणेच अहिंसा, सत्य, असत्य व धैर्य अशी चार पातीं होती आणि म्हणूनच शेवटपर्यन्त धीर धरून मंथन केले आणि इंद्राला घोडा, ऋषींना कामधेनू, विष्णूला लक्ष्मी व कौस्तुभ, शंकराला हलाहल. दानवांना मदिरा आवडली व सर्वांनीं जे हवे ते घेतलेच. कोणातही द्वेष, मत्सर व असूया निर्माण झाली नाही व देवासुरांनी त्याज्य म्हणून सोडूनही दिले नाही व कार्य थांबवलें नाही. धैर्याने शेवटपर्यंत कार्य पूर्ण केले. हें मात्र निश्चितच की देव होते म्हणूनच अमृताचे वाटेकरी झाले; व असूर? तसाच हा विचित्र सागर भरला आहे. यांतून शेवटी अमृतच निघणार. निश्चित अधिकार परत्वेच लाभ होत असतो कोणास कोणता ? हे आम्हास अनाकलनीय आहे.

ह्यातील काही कविता कंटकांजली यांच्या कंटकांजलीतील संस्कृतावरून रुपांतरीत आहेत. ते करण्यास त्यांनी उदार मनाने आम्हास अनुज्ञा दिली. ह्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. तसेच संस्कृत सुभाषितकारांचे आम्हीच काय सारे विश्व आचंद्रार्कऋणी आहे. ह्यात शंकाच कसली?

तसेच सुभाष मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. वि. गो. जोशी (तिवसकर) आणि त्यांचा कर्मचारी वर्ग यांनी हे पुस्तक अल्प वेळात मुद्रित करून दिले याबद्दल यांचे सदैव ऋणी आहोत.

**नाथ-पाठक**, दुसखेडकर

# अनुक्रमाणिका


| अ. नं. | | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | शारदा वंदन | १ |
| २. | ना जाणती मानव | |
| ३. | ये धावूनी शीघ्र तूं | |
| ४. | माझा नमस्कार त्या | २ |
| ५. | व्याख्या स्वराज्यास रे ! | |
| ६. | कोणी सांगितले महाकठिणसें हे खड्ग धारीव्रत | |
| ७. | मंगल-कामना | ३ |
| ८. | पक्षाभिमान | |
| ९. | ना घाबरें मी ऋणा | |
| १०. | चंद्रकलंक | |
| ११. | वृक्षारोपण | ४ |
| १२. | आधि सर्वा नमी मी | |
| १३. | तोची मानव एक थोर ठरतो विश्वामधे आजला | |
| १४. | मातेहि नंगा करी | ५ |
| १५. | तुजला दादा म्हणूं मी कसे ? | |
| १६. | नाना कसे रे ! म्हणा ? | |
| १७. | जातीचा अपराध जात पचवी | ६ |
| १८. | तल्लिंग पूजा करी | |
| १९. | सत्सौख्य हचा जीवनीं | |

## -: कांहीं अन्योक्ति :-

२०. रंगान्योक्ति ७
२१. अनलान्योक्ति
२२. सिंहान्योक्ति ८
२३. चांदणी वेलीवर अन्योक्ति

## -: कांही-अमृत- बिंदू :-

२४. दुःखमूळ १०
२५. विश्वांत ना मान्यता
२६. मृत-पांडव
२७. देवा ! कसा डोळस ११
२८. दुर्लभ चतुष्टच
२९. धिक्कार !
३०. सदा मृत्यु त्याची स्वये वाटे पाहे
३१. त्या पादुकांचा घडे नित्य मार १२
३२. कर्ता असे दुर्मिळ
३३. जरा कोणास ? केव्हा ? कशी येते
३४. मानव्य प्राण
३५. खरे माता-पिता १३
३६. रामनामास गावे
३७. आनंद मर्म
३८. जेथें प्रतिष्ठा तिथे १४
३९. अभ्युदय-मर्म
४०. सुख दुःख विवेक

४१. भाग्यलक्ष्मीचें स्थान १५
४२. भाग्यश्री असल्या गृहास त्यजिते
४३. असे कधीच नको
४४. प्रेमें नवा घे धडा
४५. निज मित्र तोचो १६
४६. तें जाण तूं कीर्तन
४७. तोचि मुर्दे तृप्तिचें
४८. अरविंद बोल १७

-: विचित्र - सुग्रीव :-

४९. राखिल मजला राज्यनीति १८
५०. गृह-दीप नको विझवू रे ! १९
५१. स्वरूप
५२. आज २०
५३. नंबर प्राप्ति झाली २१
५४. दुसरीच आली घरी २२
५५. पुराण्या-प्रवाशास २४
५६. मनीषा २
५७. तोड मला हरि २
५८. काळोख मजला गुरु वाटतो २
५९. कंटकांजलि २
६०. समष्टी प्रार्थना दशक ? २

# निधी - अर्पण

सदर पुस्तकाचें खर्च वजा जाता सर्व उत्पन्न श्री संत बाळानंद महाराज, क्षेत्र दुसखेड, ता. पाचोरे (जळगांव) यांचा लिहिला गेलेला " **श्री बाळानंद चरितामृत** " ह्या ग्रंथाच्या मुद्रणार्थ उपयोगात आणले जाणार आहे.

ज्यांनी इ. स. १७७४ पासून माहूरची पायी वारी सुरू केली. सौ. मृत राधाबाईस उठवले, पेंढारी लोकांचा मोड केला, जळत्या घरातून नंदीच्या मालेगांवास सावकाराच्या सर्व कुटुंबास वाचवले. व हिवरा मुक्कामी त्र्यंबकराव डेंगळ्यांना अन्यायापासून शस्त्र खाली ठेवावयास लावले आणि इ. स. १८३९ सांत ब्रम्हस्वरूपी जे लीन झाले तसेच ज्यांच्या कृपाप्रसादाने खान्देशकर महाराज ( दुसखेड ) यांची माहूरची पायी वारी आज १९८ वर्षापासून अविच्छिन्न चालू आहे. त्या संत शिरोमणी श्री बाळानंद महाराजांच्या ग्रंथार्थ सर्वांनी उदार हस्ते मदत करावी ही विनंती.

नाथ-पाठक, दुसखेडकर

## श्री बाळानंद चरितामृतास आजपर्यंत
## मिळालेली मदत

१०२ रु. श्री. गं. ब पांडे ( आण्णासाहेब पांडे) मु. हिवरा.
१०१ रु. कै. वा. बापूसाहेब पांडे मु. हिवरा यांचे स्मरणार्थ त्यांच्या सुपुत्रांकडून.
१०१ रु. श्री. अनंत राघव पाटील मु. साकूर.
१०१ रु. श्री. आबासाहेब पांडे, बेसखेड, पो. भाम (यवतमाळ)
१०१ रु. श्री. मधुकरराव मार्तंडराव कुळकर्णी, मु. खेल देशपांडे.
२५० रु. श्री. मोतिराम काळूशेठ, मु. गोंडगांव, जळगांव.
१०१ रु. विनायकराव कुळकर्णी, सिंदवाडीकर.

## श्री एकवीरा देवी माहात्म्य
## म्हणजे
## श्री रेणुकामातेचा गोष्टीरूप संसार ह्या पुस्तकास
## मिळालेली मदत

१०१ श्री. भार्गवराम बळीराम भोपी, मु. माहूर.
२० श्री. भगवान गंगाधर पांडे, हिवरा
२० श्री. चिमणराव अमृतराव पाटील, हिवरा
५१ श्री. श्रीराम आप्पा, पुसद
२५ श्री. डॉ. जाजू, पुसद

## श्री नाथ प्रकाशनाची प्रकाशित पुस्तके

# विक्रीस तयार ! ! !

| | | |
|---|---|---|
| (१) | दुर्गासप्तशती व मराठी सममंत्री | ७–५० |
| (२) | सार्थ श्रीसूक्त व कमलजाकमल कलिका | १–२५ |
| (३) | श्री एकवीरा देवी माहात्म्य म्हणजे रेणुका मातेचा गोष्टीरूप संसार | ५–०० |
| (४) | विचित्र – सागर | ३–०० |

### –: पुस्तके मिळण्याचा पत्ता :–

(१) श्री नाथ–पाठक (दुसखेडकर) मु. दुसखेड, पो. परधाडा, ता. पाचोरा (जळगांव)

(२) श्री. द. ल. देशपांडे ( साखरेकर ) मातृच्छाया ग्रंथ भांडार, श्री क्षेत्र माहूर, ता. किनवट, जि. नांदेड.

(३) श्री. गो. म. पाठक, C/o नोगिनदास गांधी, ओ. टी. सेक्शन, बरॅक नंबर ४२२, उल्हासनगर, कल्याण नं. १

(४) श्री. अरविंद दत्तात्रेय बात्रीकर, नेहरुनगर, बिल्डींग नं. ६४, रुम नं. २११७, मुंबई नंबर २४

(५) श्री. म. भा. जोशी, गोविंदनगर, मोहन सोसायटी, बिल्डींग नं. ११, रुम नं. ५६ बोरीवली (पश्चिम) मुंबई नंबर ९२

## -: श्री नाथ प्रकाशनाची आगामी प्रकाशने :-

१. भक्ति कल्पलता मकरन्द – श्री चण्डीराम महाराज कृत भक्ति-कल्पलतेबर मराठीत मकरंद १५०० कविता.

२. गीतशाकुन्तल –खण्डकाव्य– संपूर्ण शाकुन्तल नाटक गीतात.

३. चार्वाक गीत – खण्डकाव्य, दुर्योधन वध.

४. ऐतिहासिक भाऊबीज – खंडकाव्य – शिवप्रभूनें सावित्री बल्लरी किल्ला ओवाळणी घातली.

५. रामेश्वर स्थापना – रामायण एकत्र भोजन.

६. गीतांजलि गीत रत्नाकर – रवीन्द्रनाथांच्या गीतांजली व राग-रागिणीत मराठी गीते.

७. दुर्वांची जुडी – प्रभूप्रार्थना

८. कंटकांजलि – प्रभूस दुःख-समर्पण

९. तळमळ– प्रभूस आळवणी

१०. श्री बाळानंद चरितामृत – संत-चरित्र ३२ अध्याय, ३३०१ ओवी

११. मराठी अध्यात्म रामायण – लेखन चालू किष्किंधाकाण्ड संपले.

१२. विचित्र सागर – हृदय स्पर्शी अन्योक्ति सुभाषिते व अनुभव गीते

१३. नाथ–संजीवनी – हृदयास आंदोलन बसून वेळोवेळी निघालेले स्फूट काव्य.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



ह. भ. प. श्री. नाथ–पाठक, दुसखेडकर ( जळगाव )

॥ श्री ॥

# स्मृतिगंध

मधेच पडले, भस्म जहाले, पुसला ना गे ! गंध सखे !
पुष्प अशाश्वतीं शाश्वतगंधें हरिली सारी मम दुःखें ॥१॥

देह दोन म्हणुनि, गेलिस तूं गे ! मजला ऐसे सोडोनी ]।
वरें जहाले स्मृतिरूपें तूं हृदयीं माझ्या राहोनी ॥२॥

निशिदिनीं जवळी चैतन्यापरि रिझवित असते नांदूनी
गोडगोड त्या स्मृती शलाका मम हृदयीं तूं रेखूनी ॥३॥

खुणविशी मजला यावे म्हणुनी येईन मी गे प्रेमानें,
उभयही आपण मातृकृपेनें लीनहि होऊ त्वरे मनें ! ॥४॥

दि. १८-२-७३ श्री. नाथ-पाठक, दुसखेडकर

सौ. गोदावरीबाई पाठक



– तुझ्या गे स्वभावा पुढे ईश थोडा –

– जन्म –

मि॥ जेष्ठ शु. दशमी
शके १८३४

– मृत्यु –

शके १८९४ मि॥ जेष्ठ शु. दशमी
बुधवार दि. २१ जून १९७२

॥ श्री ॥

ॐ नमश्चण्डिकायै

॥

त-म-सो-मा-ज्यो-ति-र्ग-म-य

॥।

# अर्पण पत्रिका

॥

स्वाभाविकं परित्यज्य येन सर्वं क्षितीतलम् ।
रम्यं, हृद्यं, मनोहारि कारितं सर्वतो महत् ॥१॥

रस्य - रूप · स्वभावेषु गन्धरीतिगुणादिषु ।
स्थापयित्वाच वैचित्र्यं स्वयं तत्रच बिम्बितः ॥२॥

शिल्पकारः सुवर्णस्य भूषणानि करोत्यऽपि ।
भूषणेषु न तद्रूपं दृश्यते प्रतिबिम्बितम् ॥३॥

का वार्ता प्रतिबिम्बस्य ? येन सर्वं ततं खलु ।
सततं विततं तेन तत्रापि दृश्यतेऽततः ॥४॥

भूताय चाप्यभूताय विचित्रायाभविष्यते ।
अर्पितो महत्या भक्त्या विचित्रः सागरो मया ॥५॥

शके १८९० पौष शु. ११ सोमवार **नाथ-पाठक,** दुसखेडकर
दिनांक ३० डिसेंबर १९६८
रात्रौ ९॥ वाजता
वरणगांव, नागराज -- सदन

# ❀ विचित्र-सागर ✤

## १. शारदा वंदन ( पृथ्वी )

विशाल तमहारिणी ! धवलवस्त्रवासोज्वले ! ।
शशांककरहारके ! धवल पद्मसिंहासने ! ॥
मयूर-वरवाहने ! सकल वाद्यवीणाप्रिये ! ।
प्रजापति शिवाच्युता तुजविना न देवत्व गे ! ॥१॥
नसे जरि कृपा तुझी विकल विश्व विश्वांत गे ! ।
कला न जगती जगे, विफल शब्द विद्वान गे ! ॥
प्रणाम तुजला करूं विनतियुक्त हे भारती ! ।
इथे त्वरित येउनी वितर, आशि आम्हाप्रति ॥२॥

## २. ना जाणती मानव

( शार्दूल )

त्या नादांबुधिच्या स्वयं परतिरा अद्याप ना जाणसी ? ।
जाऊं आपणही बुडून म्हणुनी तूं गे ! स्वयें वक्षसी ॥
भीतीने नित भोपळा धरिसि ? वा अज्ञास देण्यास्तव ।
तूंची जाणसि शारदे ! कधिहि ना हे जाणती मानव ॥१॥

## ३. ये धावूनी शीघ्र तूं

( शार्दूल )

यावे ईश ! विचित्र सागर तिरीं खेळावया धावुन ।
आला ना जरि, पानशेत फुटुनी जाशील तूं वाहुन ।
आहे तूंहि विचित्रतात व तुझ्या कार्यांत वैचित्र्य रे ! ।
वैचित्र्येश ! तुझी विचित्र घटना देवो विचित्राशि रे ! ॥१॥

त्वच्चारित्र्य विचित्र चित्रित असे चित्रार्पिता साक्षि तू ।
अत्राऽमूत्र कलत्र पुत्र सकला त्राता असे माय तूं ॥
कंठी मंगल सूत्र, कुत्र न दिसे गोत्रेश, धात्रीश तूं ।
छत्राचा नित छत्र रात्रहरणा ! ये धांवुनी शीघ्र तूं ॥२॥

## ४. माझा नमस्कार त्या

मंत्री, राष्ट्रसभा पिता व जननी, पोलीस बन्धू जया ।
बेडी ही भगिनी, सुरा सुगृहिणी, लक्ष्मी सुता होय ज्या ॥
न्यायाधीशहि सासरा, वकिलही साला, सुरा मित्र ज्या ।
त्या गुण्डास न भीति ह्या त्रिजगती माझा नमस्कार त्या ॥१॥

## ५. व्याख्या स्वराज्यास रे !

शेती जो कसतो तयासच मिळे, खाईल त्यातें टका ।
गेहीं जो वसतो धनी तदिय तो, स्वामी पथा खेळता ॥
जो मारी दगडास तो तरुपती, नेईल त्याची गुरें ॥
स्त्रीला भ्रष्टविता धनी ठरतसे 'व्याख्या स्वराज्यास रे'! ॥१॥

## ६. कोणी सांगितलें महाकठिणसें हे खड्गधारीव्रत

पोटी भीति, मुखांत उध्दट गिरा, कर्मी दुटप्पीपणा ।
नग्न स्वार्थ मनीं, मुखीं जनहिता ठेवा, स्तवा दुर्जना ।
गुण्डा द्या नित गुप्तफूस, असलें, ह्या राष्ट्रकर्त्याप्रत ॥
कोणी सांगितलें महाकठिणसे हें खड्गधाराव्रत ॥१॥

## ७ मंगल-कामना

नाना टॅक्सरुपें धनार्जन करी, जो योजनाग्नी मधे।
अर्पूनी, करितो सदा तुटवडा अन्नास, धान्यीं खडे॥
दुष्टा मातवी, गोळिबार करवी, जो पंच राज्यामधीं।
तो संहार चतूर मान पकडे. माझी जगा शेवटीं॥१॥

## ८. पक्षाभिमान

कोणी चोर खुनी दलाल असला जै कृष्णपैकाधरी।
त्याला सर्व गुन्हेहि माफ असती मत्पक्ष जै तो धरी।
सत्कर्मी व सुधी परंतु दुसऱ्या पक्षांत जै तो असे।
शिक्षा भोगुनही तुरुंग न टळे ते भाग्य त्याचे असे॥१॥

## ९. ना घाबरें मी ऋणा

देवर्षी ऋण आणि पितृऋण हें जै जन्मताची असे।
जन्मानेच मिळे ऋणी प्रकृति ही, त्याज्या कधीही नसे॥
आणूनी मनुजें खुशाल करणे हे कर्ज चिन्तेविना।
तें फेडील पुढें पुढील कुणिही, ना घाबरे रें मी ऋणा॥१॥

## १०. चंद्रकलंक

चंद्राचा बघुनी कलंक म्हणती आहे ससा, पंक वा।
रात्रीचा गिळिला तमाद्रि म्हणुनी, हा डाग की येधवा॥
व्यापारीश व मंत्रि चंद्रभुवनीं गेलें, सवें घेउन।
जे काळें धन, तत्कलंक दिसतो, मित्रा मला येयुन॥१॥

## ११. वृक्षारोपण

' वृक्षारोपण हे घरोघरी करा ' ही मंत्री वाग् ऐकुन ।
द्वारीं लावित आम्रवृक्ष झटुनी, आलीं फळें पाहुन ॥
अंब्या वाचुन मी घरांत नितची खातों बहू फत्तर ।
गुण्डांनीं फल खावुनी, विवळुनी द्यावें अम्ही ढेंकर ॥१॥

## १२. आधि सर्वा नमी मीं

स्त्री विश्रामी, द्रविण शयनी, धूर्तबुद्धी, निलज्जी, ।
कामाधारी चटुलवचनी तत्वमस्यादिलक्ष्यी ॥
एकज्ञानी कलिमलनिधी सर्व पापाधिवासी ।
ऐशा मोठ्या धवल कृपणा आधि सर्वा नमी मी ॥१॥

श्री.रा.भा. राजपूत सरांनी समस्यापूर्तीला लिहिलेली ओळ

## १३. तोची मानव एक थोर ठरतो विश्वामधे आजला

कानीं लागुनिया पुनःपुनरपी जो मैत्रि मोडूनिया ।
होतों मित्र तदीय कपटें आत्मार्थ साधावया ॥
जो इच्छि परपात्र ओढुन स्वयें जेवावयातें भला ।
तोची मानव एक थोर ठरतो विश्वामधें आजला ॥१॥

सत्याचा करि खून नित्य नरडे दाबून खोटें वरी ।
निर्दोष्यास कलंकदान करण्या जो वापरे वैखरी ॥
अंधारा म्हणतो महारवि सदा तोची खरा जेवला ।
तोची मानव एक थोर ठरतो विश्वामधें आजला ॥२॥

विश्वीं जो करितो स्वयेंच अपुली, श्लाघा मुदें सांप्रत ।
कृष्णाला नित रक्षितो प्रयतुनी, रामास जो छेडित ।।
औदार्यास त्यजून जो कुटिलधी स्वार्थास्तवे भागला ।
तोची मानव एक थोर ठरतो विश्वामधें आजला ।।३।।

## १४. मातेहि नंगा करी

नंग्याला डरतो खुदा, मिळतसे नंग्यासची मुक्तता ।
नंग्याला सरकारही डरतसे, नंग्यास ना भीरुता ।।
नंग्यानें दिधलें स्वराज्य हंसता, नंगा महा-देवही ।
नंगा हा नित भाग्यशालि असतो मातेंहि नंगा करी ।।१।।

## १५. तुजला दादा म्हणूं मी कसे ?

नाहीं उच्चपदीं तशा न पदव्या, ऐकून थोडा नसे ।
थोडाही नच राजकारण पटू, चाटांत मोठा नसे ।।
होती जे इथं इंद्रजाल-विजयी मर्जीत त्यांच्या नसे ।
सांगावे मग तूंच आज मजला, 'दादा म्हणूं मी कसे' ?।।१।।

## १६. नाना कसे रे ! म्हणा ?

नानांना कधि देइना, नमन ना, आना कधी साहिना ।
देना पाहत ना, कुणा सुवचना, नाना गुणाब्धीहि ना ।।
कोणा भोजन देइना, न गणना, बुध्दीविना भूवना ।
नाहीं जीवहि जीवना, वद तुला 'नाना कसे रे ! म्हणा'।।१।।

## १७. जातीचा अपराध जात पचवी

अग्ने ! पावक तूं म्हणून कथिली मी सर्व माझी व्यथा ।
जातीचा तव तो असे समजुनी पोटीं जिराल्या कथा ।।
'अग्नी अग्निस जाळिना, समजलें मी क्षीण झाल्यावरी ।
जातीचा अपराध जात पचवी, जै प्राण गेला तरी ।।१।।

## १८. तल्लिंग पूजा करी

विष्णूवाहनगर्व मीच हरिला मी रुद्रवाही असे ।
शिंगे दोन व चार पाय मजला, मी बैल राजा असे ।।
ऐशा निष्फळ वल्गना जगतिया जो ना मुखानें करी ।
'त्याची जाणुन योग्यता जगत हे तल्लिंग पूजा करी' ।।१।।

## १९. सत्सौख्य ह्या जीवनीं

विश्वा जी धरणी समस्त तरणी ब्रम्हांड संव्यापिनी ।
पूर्णा निर्गुणि जै, जनांत सगुणी, निर्दोषिणी पावनी ।।
झाली आवरणी बसूनि रमणी रोगिष्ठ संकोचुनी ।
होता ती नित नागवी मिळतसे सत्सौख्य ह्या जीवनी ।।१।।

❋ ❋ ❋

# — कांहीं अन्योक्ति —

## २०. रंगान्योक्ति

*सोनें मोजति ज्या तराजु मधुनी रंगा ! तुला तोलिती ।*
सोन्याच्या वजनें तुला जरि गड्या! हे लोक रे मोजिती ।।
त्यायोगें नच गर्व तूं धरु तुझी नारीपदीं योग्यता ।
सोन्यातें नृप-देव-संत मुकुटीं लाभे सदा राजता ।।१।।

सोन्याच्या वजनास तूं मिळविलें रंगा जरी सांप्रत ।
सोन्याच्या जरि आसनीं बसत तूं पाहे तुझी किंमत ।।
सोन्याला शत दोन मूल्य रुपये पैसे तुला द्वादश ।
रंगा! किंमत तूं तुझीच समजे, व्हावे जरा डोळस ।।२।।

## २१. अनलान्योक्ति

विश्वीं तू सकलास शुद्ध करिशीं, तेजस्विता दाविशी ।
दोषांना नित घालवीत असतो शेखी अशी मारिशी ।।
पाहे रूप तुझें त्रिपाद तुजला तूं सान हाती खुळा ।
शिंगे चार तशा शिखाद्वय तुला विश्वाहुनी वेगळा ।।१।।

जाळूनी निज देह, याज्ञिक तुला सर्वस्वही देतसे ।
नाहीं शांत तुझी क्षुधा, तुजशि रे ! ना तृप्तता येतसे ।।
आहे धर्म तुझा बुभुक्षित सख्या ! तूं सर्वभक्षी असे ।
जाणूनी जग हें जगांत 'हुतभुक्' संज्ञा तुला देतसे ।।२।।

राखुंडी तव पांघरुण दिसते, तूं रे ! खरा दाहक ।
त्वत्स्वाधीन जिणें म्हणून वदती हे लोक की पावक ।
स्पर्शे केवळ तूं जिवंतहि नरा प्राण्यांस चापोळशी ।
मेलेल्यासहि जाळशी न त्यजसी, हास्यें पुन्हा नाचसी ।।३।।

## २२. सिंहान्योक्ति

वार्धक्यें जरि खंगला, नच तया चालावयाला बळ।
ना तो केसरि बोकडापरि कधी विश्वांत ह्या निर्बल॥
हत्ती गर्वहरा गजा भिववितें त्याची महा गर्जना ।
थोरांचें वय दुर्जना भय करी, संतोषवी सज्जना ॥१॥

नांवानें असती बहूत जगती चित्रांत भिंतीवरी ।
त्यांचा घात करावया न उपजे पंचाननातें मति ॥
आहे मी परिवारहीन विपिनीं ना साह्य मातें कुणी ।
ना स्वप्नांतहि त्यास हा उपजला मुर्दाड चिन्तामणि ॥२॥

कानासन्निध होतसे ध्वनि जरी त्या बेडकांचा अति ।
त्यांचा घात करावया न उपजें पंचाननाते मति ॥
हत्तीं मस्तकीं विक्रमास करणें हा धर्म ज्याचा असे ।
क्षुद्र प्राणि वधावयास कधिही अणील चित्ती कसे? ॥३॥

## २३. चांदणी वेलीवर अन्योक्ति

( सुवासिक फुलें तोडत असताना चांदणीची फांदी वाऱ्यानें सारखी हलवून मला बोलवीत होती तेव्हां )

मानेनें मज मात्र तूं खुणवुनी बोलाविशी का? बये !।

आहे पुष्पवती स्वरुपवती तूं नाजूक शंका नसे।
ना तूं ठेंगणी, उंच ना, रसवती जै नित्य मातें दिसे॥
पाहे विश्व तुला, परी तुजकडे ना कोणिही येति हे।
मानेनें मज मात्र तूं खुणवुनी बोलाविशी का बये ! ॥१॥

शालू हा हिरवा तुझा दिसतसे त्वा पुष्प शोभावरी ।
वायु हा तव साथीदार म्हणुनी नृत्यातली चातुरी ॥
सौगन्धी मनिषा म्हणून उतरी मी अंगणीं बावळे !
मानेनें मज तूं खुणावुन वृथा बोलाविशी सावळे ! ॥२॥

आहे चांदणि नांवची गगनि गे ! तीही तुझ्या सारखी ।
होती त्या अगणीत भूषित जरी, ना मान्यता त्यांस कीं ॥
डोळा लाउन त्याहि ग ! खुणविती नानंदती कोणि गे! ।
मानेनें मज तूं खुणावुन वृथा बोलाविशी कां? बये ॥३॥

आहे का तुजला सुगन्ध रतिचा? वा ज्ञानहि किंचित ।
वेडे! चंपक हा जिथें दरवळे त्यालाच गे! किंमत ॥
तेथें चांदणि तूं कितीहि फुलली नाही तुला मान गे! ।
मानेनें मज तूं खुणावुन वृथा बोलाविशी कां बये! ॥४॥

ज्ञानाग्नी जरि का विशाल असला 'सौजन्य गन्धाविना' ।
देशी वा परदेशि ही न कधिही त्वा मान ना मूल्य ना ॥
शालिन्या सहगन्ध त्यागहि जिथें तेथें यशःश्री मिळे ।
तेव्हा बाई! मिळे तयास बहुशा मान्यत्व ते आगळे ॥५॥

– उच्चकुलोत्पन्नता व वेशभूषा वैफल्य –

उद्यानावर ना कधीच जगती ना मान्यता व्यापक ।
विश्वा वा प्रभुला न रंग नखरा झाला कधी मोहक ॥
बाई चांदणि गें ! जगांत जगण्या सौगन्ध हा मुख्य गे !
मानेनें मज मात्र तूं खुणवुनी बोलाविशी वाडगे ॥६॥

# काहीं-अमृत-बिन्दू

## २४. दुःखमूळ

( भुजंग प्रयात )

जसे पर्वतामाजि खैरादि वृक्ष ।
सदा वाढती ते निगेवीण रुक्ष ।।
तसे मानवांच्या सदा जीवनांत ।
अहंकार दुःखा सदा जन्म देत ।।१।।

## २५. विश्वांत ना मान्यता

( शार्दूल )

जी धेनू कधि दूध देत न कुणा जन्मासहि घालिना ।
आहे सुदृढ, वांझ होय म्हणुनी कोणी तिला नेईना ।।
विद्या जो नच ओळखे, मधुरता, भक्ति न शालीनता ।
आरोग्यास धनास वा कुल-रुपा विश्वात ना मान्यता ।।१।।

## २६. मृत-पांडव

( पृथ्वी )

समस्त दुरितें जिथें करिति नित्य की तांडव ।
जिवन्त असुनी जगीं मृत समान हे पांडव ।।
दरिद्रि, जडमूढ-धी, सतत व्याधिने पीडित ।
सदा करित दास्य, जो, नित प्रवास जो सेवित ।।१।।

## २७. देवा ! कसा डोळस ?

चावे सर्प जयास तोच मरतो अन्यास बाधा नसे ।
याहूनी कुमती प्रसिद्ध जगती चावावयाला असे ॥
एकाच्या श्रवणास दुर्जन डंसे बाधे दुज्याला विष ।
ऐशी ना तुजला कला कळत रे ! देवा कसा डोळस? ॥१॥

## २८. दुर्लभ चतुष्टच

विश्वी ना अधिकारी एकहि असा जो निस्पृही राहील ।
जो का मंडन भूषणी असूनही कामी न जो होइल ॥
विद्या-भास्कर आणि गोड वचनी विश्वामधे दुर्मिळ ।
स्पष्टोक्ती करणार विश्व कुहरी ना वंचकी होईल ॥१॥

## २९. धिक्कार !

ह्या द्रव्य संपादनी दुःख साठे ।
हे द्रव्य रक्षावया दुःख मोठे ॥
ह्या द्रव्य भोगांतही दुःख सार ।
हे द्रव्य धिक्कारिता दुःख थोर ॥१॥

## ३०. सदा मृत्यु त्याची स्वये वाट पाहे

अकर्तव्य विश्वी करूं इच्छिणारा ।
महा विघ्नमाला स्वयें निर्मिणारा ॥
यशाचा धनी ना कधी जीवनीही ।
सदा मृत्यु त्याची स्वये वाट पाही ॥१॥

## ३१. त्या पादुकांचा घडे नित्य मार

न पात्रता ज्या तरी गर्व फार ।
निंदा करूनी जगीं होय थोर ॥
भासे क्षणी त्या जरी विश्वी थोर ।
त्या पादुकांचा घडे नित्य मार ॥१॥

## ३२. कर्ता असे दुर्मिळ

स्वामीचें हित साधणार ठरतो लोकांतरी दुष्ट की ।
लोकांच्या हित साधकावर धनी होतो महा रुष्ट की ॥
एकांगी भुवि वागणें ठरतसे वैषम्य –दायी–बळ ।
साम्यें वर्तन जो जगीं करिल तो कर्ता असे दुर्मिळ ॥१॥

## ३३. जरा कोणास ? केव्हा ? कशी येते

येते सन्त मनीं जरा प्रथम कीं संसार क्षेत्रातली ।
त्या मागूनच इंद्रियास, तनुला येते जरा साबुली ॥
येते तीच जरा असन्त तनुला ग्रासी कुरूपावली ।
तच्चित्तीं कधि येत ना विहरते, वर्धिष्णु कामावली ॥१॥

## ३४. मानव्य प्राण

मर्यादा नित प्राणवायु समजा, लोकीं यश:कीर्तिचा ।
लोकाचार अपान वायु नितची त्रिश्वीं प्रतिष्ठाद्रिचा ॥
बुद्धीही नित व्यान वायु समजे औदार्य शान्तीस ती ।
नित्यानित्य–विवेक नित्य–विजया आहे उदानागति ॥१॥

साम्य प्रेम समान वायु समजा षड्वैरिचा जो अरि ।
प्रेमे प्रेम मिळे व दू:खहि टळे आनंद घे वैखरी ।।
प्राणांनी जगते शरीर परिही मानव्यता ना तिथे ।
मर्यादादिक पाळुनीच जगते मानव्यता ह्या इथें ।।२।।

## ३५. खरे माता-पिता

होता रामप्रभू पवित्र जगती वैदेहि तैशीच ती ।
तेजाचे पुतळे असून जगती त्यांची पवित्रा युति ।।
मर्यादा नित पाळुनी विखुरली लोकापवादास्तव ।
मर्यादेस्तव लौकिकास्तव बघे सीता अरण्याहव ।।१।।

## ३६. रामनामास गावें

ती व्यर्थे न्यायशास्त्रे घटमठ करिती, शाब्दिके धातुर्दृष्ट ।
तैशी मीमांसकांची 'सकल जग असे कर्म निर्मीत सूचित' ।।
वेदान्ती शून्यभाषी अखिल बघुनही, शून्य कैसे गणावे ।
ऐशी शोधून शास्त्रें निवडून ठरले 'रामनामास गावे' ।।१।।

## ३७. आनंद मर्म

मातेची गुरुची, जिथे सुरु असे निंदा चव्हाडी महा ।
कानांना बहिरे करा नित तिथें, सोडा अहंभाव हा ।।
निंदा भोजन हेच पुष्ट करितें त्या दुर्जनांना सदा ।
साहे ना, तरि मौन ठेवुन, कुठें जावे निघूनी तदा ।।१।।

## ३८. जेथें प्रतिष्ठा तिथें

चंद्राला रविला नदीस तरुला पाहून येते मनीं ।
सृष्टीचा क्रम त्याग,-दान, सहणे हा धर्म आहे जनी ॥
स्वार्थाचा लवलेश ना विषमता, सत्तान्धता ना इथें ।
कर्तव्यीं नित दक्षता, चतुरता, जेथें, प्रतिष्ठा तिथें ॥१॥

## ३९. अभ्युदय-मर्म

उद्योगी नरकेसरीस वरिते लक्ष्मी स्वयें आपण ।
दैवाचा अवलंब जे करिति ते कर्तव्य त्यागी-जन ॥
† दैवाच्या शिरि नाचुनी निजबळें साधा प्रयत्ना इथे ।
ना यत्नें जरि साधलें सुमतिनें दोषास शोधा तिथें ॥१॥

## ४०. सुख दुःख विवेक

नाही स्वाधिन जे पराधिन असें ते दुःख मोठे विख ।
आहे स्वाधिन तें न होय सुख की, निर्मळ हो सात्विक ॥
संतांनी सुख दुःख लक्षण इथे सांगीतले मार्मिक ।
अतृप्ती नित दुःख बीज समजा, संतोष हेची सुख ॥१॥

---

† टीप– 'यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः' याचा अर्थ त्यात तुमचा काय दोष ? असा जर घेतला तर प्रयत्नास वैफल्य येऊन हा श्लोक दैववादीच होतो म्हणून 'कः अत्र दोषः ? इति त्वं शोधय' असे आम्हास बरे वाटते.

## ४१. भाग्यलक्ष्मीचें स्थान

नाही क्रोध जिथें, न आळस जिथे, बुद्धी न नीचा जिथें ।
कर्तव्यीं नित दक्षता वसतसे व्यासंग ग्रंथीं जिथें ॥
जेथें सात्विक भक्ति आणि समता उद्योग तृप्ती जिथें ।
जेथें नित्य जितेंद्रियत्व, वसते ही भाग्यलक्ष्मी तिथें ॥१॥

## ४२. भाग्यश्री असल्या गृहास त्यजिते

जेथें कर्कशता कृतघ्न घनता दुर्दम्य-कोपिष्ठता ।
तैशी नास्तिकता कुकर्मि प्रियता सत्तान्धता क्रूरता ॥
अन्याया नित पुष्टता अवतरे दुष्कर्मजा संतति ।
भाग्यस्त्री असल्या घरास त्यजिते वाणी असे भारती ॥१॥

## ४३. असे कधीच नको

दावाया नित थोरवी झटुनिया नाविन्य दावूं नको ।
नाविन्यास्तव न्याय नीति कधिही मातीत गाडू नको ॥
साधावा नित्य स्वार्थं तूं म्हणुनिया हिंसत्व घेवू नको ।
सर्वांशी नित जीवनीं कधिहि तूं बन्धुत्व सोडू नको ॥१॥

## ४४. प्रेमें नवा घे धडा

पश्चात्ताप करी मना ! सतत तूं दोषास्पदें जाणुन ।
'नाही मी करणार' निश्चय करी आता तरी येथुन ॥
'केला निश्चय' ना निवेदन करी गर्वा त्यजी भारुडा ।
राहे सावध नित्य तूं निजपथीं प्रेमे नवा घे धडा ॥१॥

## ४५. निज मित्र तोची

झाले प्रमाद कधि ना दिसती स्वताला ।
दावील जो नर तुला हितकारि त्याला ॥
मानी, मना ! तुजवरी बहु प्रीत त्याची ।
मानू नको रिपु तया निज मित्र तोची ॥१॥

## ४६. तें जाण तूं कीर्तन

भक्ति-ज्ञानज-वृक्ष-वायु वितरी शांता मुमुक्षू क्षुधा ।
देई षड्रिपु जिंकण्या बुध-करी तेजोनिधी आयुधा ॥
होते ज्यांत पवित्र निर्मळ सदा गंगेपरी वर्तन ।
जाते दूर मनोव्यथा वितळुनी 'तें जाण तूं कीर्तन' ॥१॥

खेदाते शमवी मनास रमवी दुर्बुद्धि जी घालवी ।
ऐकूनी भवदु:ख विस्मृति घडे, कर्तव्य जे दाखवी ॥
रज्जू संस्कृतिची तनूस फिरवो, ना फेर घेई मन ।
अद्वैता वितरून चित्त रमवी तें जाण तू कीर्तन ॥२॥

कर्णी शब्द सुधा विलास करितां निर्ग्रास्त होतें मन ।
त्रैगुण्या नल शांतवी, प्रगटवी मानव्य रासायन ॥
श्रोत्यांच्या हृदयीं सरस्वति करी आनंद पारायण ।
ऐशी वैखरी ज्यांत नित्य विलसे 'ते जाण तूं कीर्तन' ॥३॥

## ४७. तोचि मुदें तृप्तिचें

पद्माची कलिका स्वयें निजबळें पाण्यातुनी ये वरी ।
झाले कर्म तिचे तिथेच सरलें तें आत्मशक्ती परी ॥
देई भास्कर हा विकास तिजला श्री आणि सौगन्धही ।
वायू हें सफळा जगांत भरतो तद्गंध कीर्तीसही ॥१॥

भावाब्धी मधुनी ब्रशीच कविता करुनी येते स्वयेंची बरी ।
टीकाकार तिला विशालं करुनी श्रीकीर्ति देतो बरी ॥
विद्वान सज्जन जे रसज्ञ असती ज्ञातेच भोगी तिचे ।
देती ढेकर जे रसाळ मधुलिट् तेची मुदे तृप्तिचे ॥२॥

## ४८. अरविन्दबोल

त्या पद्मिनीला रथ काय जाणे
ती पद्मनेत्रासच होय लेणे
जाणें मरन्दा कधि गन्ध वाही
भृंगेश तो एक रसज्ञ होई ॥१॥

ना शर्करेची रुचि रासभाला
दुर्भाग्य त्याचे, नित भार भाला
पंकास ना पंकज गन्ध काही
भृंगेश तो एक रसज्ञ होई ॥२॥

विश्वी पयोधी जगमान्य झाला
विद्यानिधीही जगवंद्य ठेला
चातुर्य नाही मकरन्द भोगी
भृंगेश तो एक रसज्ञ होई

विद्या पण्डित वा महाधनपती सौंदर्यशाली जरी।
विश्वीं ख्यात दिगन्त कीर्तियुत वा माधुर्यभाषी तरी॥
नाही ते मधुलिट् कधीच ठरले विश्वांत जै भास्कर।
मित्रा! हे अरविंद बोल तुजला केले मदे सादर ॥१॥

# विचित्र—सुग्रीव

## ४९. राखिल मजला राज्यनीति

नकोच देऊ पैका मजला ।
अथवा सुंदर पत्नी ॥
सुखोपकरणे नकोच देऊ ।
अथवा सुपीक भूमि ॥१॥

उच्च पदाची जागा पण तूं ।
नकोच देऊ येथें ॥
कृपा करावी एकच मजवर ।
नृशिर धारी वृषभपते ॥२॥

सर्व सुखे ही देशिल मज जरी ।
प्रणाम राहिल त्याला ॥
म्हणून म्हणतों भारतांत ह्या ।
मुसलमान करी मजला ॥३॥

कुणाच्याहि मी धनसुख दारा ।
छिनुन होइन नगरपति ॥
विघ्नें येता भय पण नाही ।
राखिल मजला राज्यनीति ॥४॥

## ५०. गृह-दीप नको विझवू रे !

कशास धरिशी आस धुक्याची ।
किंवा बाळा ताऱ्यांची ॥
अस्थिर त्यांचे जीवन सारें ।
वाट पहाती मृत्यूची ॥१॥
जलावरिल बुडबुड्यास बघुनी ।
जल कुहरीं का पहुडावे ॥
रंभापर्णी मोक्तिक बघूनी ।
कशातले कां त्यागावे ? ॥२॥
स्वातंत्र्याचा काळ कळे मज ।
रुचीप्रमाणे घेई रे ! ॥
चपला बघ पण चपल होउनी ।
गृहदीप नको विझवूं रे ! ॥३॥

## ५१. स्वरूप

कधीच नव्हती आस धुक्याची ताऱ्यांची वा धारांची ।
अभ्राची वा इन्द्रधनूची आशा नव्हती कोणाची ॥१॥
उगाच आलें धुकें पहुडलें दृष्टी रोखिलि लोकांची ।
त्या डोळ्यांनी दुषित गणिलें नसता वानी दोषांची ॥२॥
आपण होउन तारे आले तारा आल्या नखऱ्याच्या ।
चमकुन प्रहरे चार तिथेची शक्ति गेल्या सर्वांच्या ॥३॥

गुंजमात्रही त्या तेजाची मज ना शिवली कोर जरा ।
निर्लेपत्वा बाध न आला, पर्जन्याच्या जरी सरा ॥४॥
सरसर करुनी येत सरा जरि सरकुन गेल्या माघारा ।
आर्द्रत्वाचा मुळी न आला मजला किंचित ओलसरा ॥५॥
सूर्य तापवी तप्त न होई, कृष्ण मेघही ना झाकी ।
येउनी थकला,थकले सर्वचि निर्विकारची मम झांकी ॥६॥

## ५२. आज

जगावयाला जगीं न जागा ।
जन्मून दिधला शीण वाउगा ॥१॥
आज जगाच्या क्षितिजावरती ।
उदयगिरीवर असत्यमूर्ति ॥२॥
सती दामिनी बिकट हांसुनी ।
हृदय कपाटी नखाग्र रोवुनी ॥३॥
हांसत सांगे फाड येथुनी ।
गिधाड वदनीं दे फेकूनी ॥४॥
क्रम व्हावा तो अक्रम म्हणुनी ।
क्रम टाळोनी विक्रम अवनीं ॥५॥
करिती पराक्रम मेंढयावरती ।
केसरि बघुनी विवस्त्र होती ॥६॥
असत्य झालें सत्य जगीं ह्या ।
विश्वावरती मृत्यू छाया ॥७॥

दा. क्र. ९८८७९

## ५३. नंबर प्राप्ति झाली

जावे गांवा म्हणूनी, नटुनथटुन मी, वेष घालून जेव्हां ।
आलों मोटार-धामीं तिकिट मिळविण्या रांग पाहून तेव्हां ॥
दुर्भाग्यानें प्रयासें दिनकर- किरणे तापलों रांग केली ।
आली मोटार, गेली तरि पण मज ना नंबरप्राप्ति झाली ॥१॥

येता माझ्या घरीं मी सहज गरजली भामिनी कोपपूर्णा ।
नाही हो पीठ गेहीं दळुन लवकरी आज आताच आणा ॥
डब्बा घेऊन गेलों गिरणिवरति मी पाहुनी रांग केली ।
चक्कीही बंद झाली तिथं पण मज ना नंबर प्राप्ति झाली ॥२॥

आलों गेहीं म्हणालों चल, चल सखये! पाहु गे! नाटकातें ।
तेथें रांगा बघूनी झटकन वदलों लागली नाट कांते ! ।
रेटारेटीस केले तिकिटही रुसले, गेहिनी गेहिं गेली ।
त्रैलोक्यी दुर्लभा ही कळुनच चुकले नंबरप्राप्ति झाली ॥३॥

बारा झाले निशेचे विवळत पडलो वाटला थोर खेद ।
निद्रा गेली तिनेही मज नच दिधला नंबराचा प्रसाद ॥
प्रात:काली प्रियेने चुलीवरति चहा ठेवण्या घाई केली ।
त्या दुग्धे मोहिनीनें अवनिस पुजिले नंबर प्राप्ति गेली ॥४॥

झाली होती परीक्षा सर-जन सगळे मद्गृहा लागि आले ।
त्यांचा सत्कार केला, हळहळु वदले ठीक आहे कि ढोले ।
झाले का पेपरांचे गिरिवर तुमचे? नंबरांची प्रणाली ।
हाती देता तयांनी, हंसतच वदलों नंबर प्राप्ती झाली ॥५॥

## ५४. दुसरीच आली घरी

कितो तुझी वाट पाहूं ।
पाहुनीया थकलोसें ॥
दोन वाजताच नित्य ।
प्रतिदिनीं एत असे ॥१॥

घड्याळयांत सात झाले ।
वानिगही येत नाही ॥
तारागण गगनीचा ।
फलाटि हा जणू येई ॥२॥

मास्तरांनी ऑफिसाच ।
दार मधे बंद केलं ॥
पावसाचं शिरवही ।
सरसर तिथें आलें ॥३॥

पुनवेला वेटिंग्रुम ।
आवसिच रुप घेई ॥
मिण मिण करण्याची ।
दीपबाळ करी घाई ॥४॥

वेटिंगाची खोली तेथें ।
भली होती नांगरली ॥
वीस पाय उंदराची ।
राज्यें तेथें विराजली ॥५॥

जरि होतें वेटिंगरूम ।
क्षेत्रफळें संकोचलं ॥
तरीपण फलाटिच्या ।
ताऱ्यांनी ते भरियेलं ॥६॥

स्पर्श सुख सर्व मांड्या ।
घेत होत्या नाखुषिनें ॥
बाहुशी ती भुज खेळे ।
जरी होता आंथरून ॥७॥

कुठें मुठें आगकाडी ।
पेटवीत कांजवे की ॥
प्रकाशांत ज्यांची त्यांची ।
घेती जवळ बोचकीं ॥८॥

काजण्यांनी कृपा केली ।
धुकाळलं तें आकाश ॥
चढाओढ सुरू झाली ।
खोकल्याची सावकाश ॥९॥

भगिनींनीं ओंकण्याची ।
कला केली आत्मसात ॥
वैगुण्याची बक्षिसे त्या ।
खिन्नपणें स्वीकारित ॥१०॥

पावसाला जोर चढे ।
वेटिंगरूम तळं झालं ।
संधि साधु दुष्ट वारा ।
नष्ट करी दीपबाळ ॥११॥
बाळासाठी रडारड ।
जणू झाली तेथ सुरू ।
काय झालं बघायाला ।
गाडी आली झुरुझुरू ॥१२॥
चढतो ना चढतों तों ।
शिटी विना गाडी सुटे ।
शोधा शोध करितों तो ।
स्टेशनात गाडी ठाके ॥१३॥
घांदलीत उतरलों ।
घेऊनिया काही तरी ।
बदलून पिशवी ती ।
दुसरीच आली घरी ॥१४॥

## ५५. पुराण्या-प्रवाशास

दाढीला धरुनी डब्यांत चढला तू खीडकीतून रे ! ।
ना देणार तुला कुणी उतरुनी, तूं स्थीर झालास रे ! ॥
नाही स्थान तुला अजून बसण्या. आहे उभा तिष्ठत ।
द्या जागा बसण्यास थोडि तरि हो ऐसें दुज्या प्रार्थित ॥१॥

शेजाऱ्यास वदे बसा प्रथम की दो स्टेशने आपण ।
मातें नंतर द्या बसूं ठरवुनी तो बैसला जाउन ॥
आशाळा परि तूं उभाच असशी, ना यांत मानीपणा ।
वर्षाचा पति, बायको पुनरपी हा न्याय कैसा गणा ? ॥२॥
छोटासा असुनी डबा चढति हे ह्यांना नसे अक्कल ।
जेव्हा तूं चढला, स्थिती विसरला आता सुचे शक्कल ॥
झाले हो बहु पर्मनंट सिट की 'ना येंउ द्यावे कुणा' ।
गाडीचे हित जाणण्यास करिशी का रे ! वृथा वल्गना ॥३॥
यातायात करून तूंच चढला नाही तुला का स्मृति ।
येथे जे चढती चढेल बनती आता स्फुरे ही मति ॥
रक्षी यास गजानना तव पदीं माझी तुला प्रार्थना ।
जन्मूनी नर, वानरा परिकृती उड्डाण तैसेच ना ? ॥४॥

## ५६. मनीषा

दीपाला ह्या विझवाया प्रभु ।
असेल आले तुझ्या मनीं ॥
खुशाल विझवी मोद भरें तूं ।
वीज तयावर पाडूनी ॥१॥
गिरिवर फेकुन झंझावातें ।
अथवा विझंवी पर्जन्यें ॥
फटकारा वा मारुन त्याला ।
विझवि त्वरें तूं प्रलयानें ॥२॥

स्नेहपूर्ण हा दीप नित्यची ।
वात त्रिगुणी त्यांत असे ॥
सुवर्णपात्री तेंवत असता ।
नित्य प्रमोदें पूर्ण असे ॥३॥

अंधाराचा जराहि नमुना ।
दिलान त्यानें कुणाप्रति ॥
वितरत होता यथाशक्ति तो ।
तेज जगाला शीघ्रगति ॥४॥

कधीच त्यानें लाविलि नाही ।
आग कुठेंहि ह्या जीवनिं ॥
चटका पण रे ! दिधला नाही ।
कधी कुणाला ह्या भुवनीं ॥५॥

नाहीं सत्ता नच स्वातंत्र्य ।
गुन्हे कसे ते करील रे !
जीव हि त्याचा खूप सानुला
हांसत होतें जग सारें ॥६॥

विझवु नकोरे ! विजवु नको तूं ।
विनती माझी ऐशी न ॥
विझवितानां पाडु नको रे ! ।
त्यावर काजळ सैतान ॥७॥

एक प्रभू तूं माझी विनंती ।
इतकी लज्जा रक्षी तूं ॥
साऱ्या विश्वी बालक-पालक ।
निर्वाणीचा रक्षक तूं ॥८॥

## ५७. तोड मला हरि !

(मालकंस)

झडकरि झडकरि तोड मला हरि !
धुळींत जोवरि पतित न तोवरि ॥धृ॥
मजसम पुष्पा तव माळेमधि ।
डाव मिळे वा न मिळे मज कधि ।
ना जाणे ही मम जड बुद्धि ।
फटकाऱ्याचे भाग्य दे तरि ॥१॥
झडकरि झडकरि तोड मला हरि !
तोड तोड हरि विलंब न करी ।
अस्ता जाईल दिनमणि हा हरि ।
उरेल जीवनि तमो वैखरि
तव पूजेची जाईरे सरि ॥२॥
झडकरि झडकरि तोड मला हरि! ।
जोंवर आहे तनुवरि रंग ।
जोंवर किंचित आहे गंध ।
जोंवर पात्रीं मधु परिपूर्ण ।
तोंच तोड तूं येउन झडकरि ॥३॥
झडकरि झडकरि तोड मला हरि !।

## ५८. काळोख मजला गुरु वाटतो

राञ असोनी निशा संपली
क्रांति युगाची उषा उदेली ॥१॥

तडित् कडाडहि गान सुरेलें।
वज्रपातही प्रसाद झाले ॥२॥

प्रबल दाह पण मलय समीरण।
असिधारा पण सुरम्य जीवन ॥३॥

प्रबल शत्रुपण मित्र भासले।
वृद्धपणीं मज शिशुपण आलें ॥४॥

साऱ्या विषमीं समत्व भासें।
दु:ख गरलहि अमृत सरसें ॥५॥

अखिल कठिणता मृदुल वाटली।
भकासताही रम्य भासली ॥६॥

नयन पाहती सदा रमणिय।
नकोच मजला तो सूर्योदय ॥७॥

नैराश्यातहि रसिकपणा तो।
जेणें दिधला त्या वंदीतो ॥८॥

पातक स्पर्शहि दूर करी जो।
काळोख मजला गुरु वाटतो ॥९॥

## ५९. कंटकांजलि

देवा काय तुला समर्पण करूं हेची मला नाकळें।
आहे सर्वंच रे! तुझ्या जवळ की, भक्ते तुला अर्पिलें ॥
केला शोध मनें तदा समजलें ना दुःख ध्यानीं मनीं।
तें मी अर्पितसें तुला अघहरा! तें गोड घे मानुनी ॥१॥
नाही मत्सर वानगी तुजकडे, माझ्यांत तो पुष्कळ।
तोची वाहून मी तुला पुजितसे मानून घे सोज्वळ ॥
क्रोधाचा दिसतो भयानक सदा दुष्काळ गेहीं तुझ्या।
क्रोधें क्रोध तुला समर्पण करी स्वीकार राधाप्रिया ॥२॥
वस्त्रें, भूषण, रत्नही तुज विभो! भक्तीं सदा अर्पिली।
प्रेमें खावुन गोड अन्न तुजला, झाली अजीर्णावली ॥
मद्गेहीं नित नांदती विकसती एकादशी निर्जला।
वाहूनी तुज भक्तिनें हरिसख्या! होईन मी मोकळा ॥३॥
भक्ताचें नित दास्य तूं करुनिया रात्रंदिनी भागला।
भक्ताच्या करिताच युद्ध समयीं तूं सारथी जाहला ॥
स्वामिनी करणे असें उचित कां? ना धोरणी श्रीपते।
मज्जन्मार्जित दास्य घे तुजकडे होईश लक्ष्मीपते ॥४॥
दास्यत्वा करू मी कसें? न च कळे अज्ञान माझ्यातले।
तें, घे मी तुज अर्पितों गिरिधरा पायीं तुझ्या ठेव, तें ॥
त्यानें मी बहु भागलों भववनीं अन्धापरी भ्रान्तलों।
द्यावे ज्ञान मला तुला समजण्या पायीं तुझ्या
पातलो (लागलो) ॥५॥

आसक्ती नित पोषिली श्रमुनिया छप्पन वर्षामधें।
ना रोडावलि नित्य पुष्ट तरुणी मी तीच वाही मुदें॥
स्वीकारून तिला प्रभो झडकरी मातें करी मोकळा।
तेणें लाविन की प्रसन्न मतिनें त्वद्भक्तिचा मी मळा॥६॥
माझ्या सोबत जन्मलें नपुसकीं कर्तव्य हें नित्य तें।
आसक्ती मम वांझही परणितें हे सर्व भांडें रितें॥
नाही रे सुचला प्रपंच उरला तो एक माझ्या करी।
तोची वाहुन मी तुला भजतसे तूं एक आतां हरी॥७॥
नाही कंटक अर्पिलें तुज कुणी ना वाहिलें तूं कधी।
माझ्या सन्निध ना दुजे किमपि रे ! तू जाणता की सुधी॥
आहे तेच तुला समर्पुन सख्या मी पूजिलें आजला।
घ्यावा कंटकयुक्त अंजलि हरें ! मोक्षास नेई मला॥८॥

## ६०. समष्टी प्रार्थना दशक ?

बघोत नर सर्वही विबुध हो सदा सोज्वल।
सदैव तुमच्या कृपे श्रुतिवरी पडो मंगल॥
निरोग सुदृढा तनू नित करो महो-पासना।
असे सफल होउ द्या सकल मानवी जीवना॥१॥
होवो आम्हास सारे सकल गगन हे नित्यची शांति युक्त।
होवो हे शांति दायी सकल सम जना सर्वदा अन्तरिक्ष॥
म्हा सर्वास होवो सकल रसरसा मेदिनी शांतिरूप।
ा दुष्टास होवो सरस-रसमणि शांतिदा नित्य आप॥२॥

होवो ह्या शक्तिदायी बुध–अबुध जना औषधी शांतिरूपा ।
आम्हा सर्वांस होवो तरुवर लतिका चंद्रमा शांतिदीपा ॥
विश्वीं विश्वस्थ जें जें स्थिरचर वसलें तेंहि आम्हास शांतिः ।
सर्वारिष्टास शांतिः अविरत विलसो शांति शांतिश्च
शांतिः ॥३॥

ह्या मोहा शांति देई द्रुततर प्रभुजी शांतवी क्रौर्य सारें ।
विश्वाच्या सर्व पापा शमवुन सदया दे सदा सौख्य बा रें! ॥
कल्याणाब्धींत आम्हा सतत विहरुं दे शांतवी क्रोधसिंधु ।
नित्यानंदारविन्दा तव पदकमलीं वाहु दे दीनबंधु ॥४॥

कल्याण स्वरुपा प्रभो सुखरुपा आनंद रूपा सुरा ।
साष्टांग प्रणिपात हा तुजप्रति कीर्तीश तेजस्करा ॥
कर्ता तूंच सुखास मंगलमयी कल्याणदायी महा ।
मांगल्या कर मंगलेश तुजला देवा नमस्कार हा ॥५॥

असो पात्र आम्ही अपात्री परेशा! ।
गुणीवाऽगुणीवा कलावान् गुणेशा ॥
बली निर्बली थोर सानास रक्षी ।
जगूं दे समस्तास एकत्र अक्षी ॥६॥

प्रभो तूंच आम्हास एकत्र तारी ।
अम्हाला विभो तूंच एकत्र मारी ॥
परिच्छिन्न शक्ती घडो एकरूपा ।
मनी तेंवुदे नित्य औदार्य दीपा ॥७॥

प्रभो आमुची ज्ञानगंगा सदा तूं ।
तुझ्या रूपसिंधूमधे साठवी तूं ॥
अम्हा शीघ्र तेजस्विता देउनीया ।
म्हणी द्वेष भावा हरे ! नाशवी ह्या ॥८॥

परस्पर सहाय्यता सकल लोक चित्ती वसो ।
समस्त जनमानसीं निरभिमान वृत्ती ठसो ॥
समस्त जनज्ञान हे विकसुनी पळो द्वेष हा ।
अम्हा सकल जीवनीं वितर तूं प्रमोदा महा ॥९॥

तेजस्वी पण रोमरोमिं भरु दे आम्हा यशस्वी करी ।
राष्ट्रात्मा नित होऊ दे सकलघी धर्मार्थ दे तूं बरी ।
आरोग्यास तनूंत नित्य हंसु दे अध्यात्म नांदो नित ।
सच्चित्कंद मुकुंद नंद-तनया इच्छा असो ही इथं ॥१०॥

॥ श्री सच्चिदानंदार्पणमस्तु ॥

वरणगांव – इतिशम् – नाथ–राउक – दुसखेडकर
१८९० पौ शु १३ बुधवार १।१।६९

मराठी ग्रंथ संग्रहालय
८०३४९
२९२२
मराठी ग्रंथ संग्रहालय

REFBK-0018849

REFBK-0018849